<u>अत्यंत तातडीचे</u>

आकस्मिक खर्चाची संक्षिप्त देयकांव्दारे काढण्यात आलेल्या रकमांची तपशीलवार देयके सादर करण्याबाबत.

CR1987031201

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक मआख-१०८७/प्र.क्र.४५/कोषागार-६,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ मार्च १९८७.

<u>वाचावे</u>:- १] शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक डीएटी-२०६२/१५७/स्पेशल/६२-बारा, दिनांक ५ जुलै १९६२.

२] शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक एफएनआर १०६५/१०७३८६/१२७२/सात, दिनांक २४ ऑगस्ट १९६५.

३] शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक एमसीई १०७९/सीआर-७५७/जीइएन-५, दिनांक २६ ऑक्टोबर १९७९.

४] शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक टीआरडब्ल्यु १३८२/सीआर-६७३/८२/एडीएम-९, दिनांक १५ ऑक्टोबर १९८२.

५] शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक टीआरडब्ल्यु १३८३/सीआर-६७९/८३/एडीएम-९, दिनांक २ जानेवारी १९८४.

६] शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक एमसीई १०८४/सीआर-४९६/जीईएन-५, दिनांक ६ जुलै १९८४.

<u>परिपत्रक</u>.- संक्षिप्त देयकावर आगाऊ रकमा काढण्याची नियमांत विहीत केलेली सुविधा त्या रकमांचे सत्वर प्रदान करणे आहरण व संवितरण अधिका-यांना सुकर व्हावे व त्या पाठोपाठ अशा संक्षिप्त देयकांकरिता तपशीलवार देयके नियंत्रक अधिका-यामार्फत महालेखा-पालांकडे/लेखा परीक्षा अधिका-यांकडे कोणत्याही परिस्थितीत पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यन्त सादर करणे सहज शक्य व्हावे यासाठी करण्यात आली होती. अशा रीतीने तपशीलवार देयके वेळेवर सादर करण्यात आल्यामुळे त्या संबंधीच्या लेखा परीक्षणाचे काम लवकरांत लवकर पूर्ण करणे महालेखापालांना सुलभ होते व संविधानाने त्यांच्यावर सोपविलेली वैधानिक उत्तरदायित्वे योग्य मुदतीत पूर्ण करणे शक्य होते. संक्षिप्त देयकांवर रकमा काढल्यानंतर संवितरण अधिका-यानी पार पाडावयाची कर्तव्ये जाणीवपूर्वक, सक्षमपणे परि-पूर्णतय: व विहीत मुदतींत पार पाडली जात नाहीत. एवढेच नव्हे तर यामध्ये बेसुमार विलंब होतो असे अनेक वेळा शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर त्यामुळे निर्माण होणा-या परिणामाचे गांभीर्य, वित्तीय औचित्याची तत्वे, वित्तीय शिस्तीचे नियम व कोषागार नियमांच्या अनुपालनाची आवश्यकता जाणीवेने लक्षांत घेऊन वर नमूद केलेल्या कांही परिपत्रां-व्दारे आवश्यक सूचना वेळोवेळी प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. तरीसुध्दा यासंबंधी पाहीजे तेवढे लक्ष दिले जात नाही व दिवसेंदिवस थकीत प्रकरणे वाढतच आहेत ही वस्तुस्थिती शासनाला अत्यंत चिंतेची बाब वाटत आहे. लोकलेखा समिती या संदर्भात वारंवार प्रतिकुल

टीका करीत आहे व थकित सर्व प्रकरणे निकालांत निघावीत व यापुढे अशी नवीन प्रकरणे उद्‌भवू नयेत यासाठी शासनाने ठोस कार्यवाही करावी याबद्दल सदर समिती अतिशय उत्सुक आहे असेही सर्व संबंधित कार्यालयाना/विभागांना अनेक वेळा कळविण्यात आलेले आहे.

२. याप्रकरणी कसूर करणा-या अधिका-यांची नावे शासनाला कळविण्यात यावीत, त्यांना त्यासाठी व्यक्तिशः जबाबदार धरण्यात यावे व त्यांच्यावर उचित अशी कार्यवाही करण्यात यावी असे स्पष्ट आदेश शासनाकडून निर्गमित करण्यात आलेले असूनसुध्दा अजूनही असमाधानकारक परिस्थिती चालूच आहे.

३. पूर्वीच्या संक्षिप्त देयकाची तपशीलवार देयके निकालांत निघाली नसतील तर त्यानंतर कोषागारावर सादर करण्यात आलेले कोणतेही संक्षिप्त देयक स्वीकारण्याचे कोषागार अधिकारी नाकारु शकतात व अशा परिस्थितीत शासनाचे व्यवहार थंडावल्यास संबंधित अधिका-याना त्यासाठी व्यक्तिशः जबाबदार धरण्यांत येईल याचीही जाणीव वेळोवेळी करून देण्यात आलेली आहे. शासनाने एवढे कडक आदेश निर्गमित केल्यानंतरही आज असलेली असमाधानकारक परिस्थिती संबंधित आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी आपली वैधानिक जबाबदारी यथायोग्यरीतीने पार पाडीत नाहीत ह्याचेच द्योतक आहे. अशा अधिका-यानी सादर केलेली संक्षिप्त देयके रोखून धरण्यांत यावीत अशा सूचना प्रायची वेळ महालेखापालांवर आलेली आहे. परंतु परिस्थितीमध्ये सुधारणा होईल ह्या अपेक्षेने ते सामंजस्य दाखवित आहेत.

४. प्रशासनामध्ये गतिमानता व शिस्त आणण्यासाठी शासन वचनबध्द आहे. विकासाच्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये अडथळा येऊ नये, विविध कार्यक्रमांच्या प्रगतिमध्ये व व्यवहारामध्ये अडसर निर्माण होऊ नये म्हणून आतापर्यन्त शासनाने नरम धोरण स्विकारले होते, परंतु विहीत नियमांची व शासनाच्या आदेशांची पायमल्ली करण्याकडे दिवसेंदिवस वाढत चाललेली अनिष्ट प्रवृत्ति व तीचे परिणाम लक्षांत घेऊन शासनाने आता कडक धोरण स्विकारण्याचे निश्चित केले आहे व कोणत्याही प्रकारची वित्तीय गैरशिस्त व शासकीय आदेशांची अवहेलना शासन इतःपर सहन करणार नाही याची सर्व संबंधित अधिका-यांनी कटाक्षाने नोंद घ्यावी.

५. शासन असेही आदेश देत आहे की —

[१] दिनांक १५ मार्च १९८७ रोजी एक वर्षापेक्षा जास्त कालावधीपूर्वी सादर केलेल्या संक्षिप्त देयकांची तपशीलवार देयके ज्या अधिका-यांनी सादर केली नाहीत, त्यांच्याविरुध्द <u>शिस्तभंगविषयक कार्यवाही</u> करण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागाच्यां सचिवांकडे पाठविण्यांत यावेत.

[२] मंत्रालयीन विभागानी यासबंधीची <u>जबाबदारी निश्चित करून</u> संबंधित अधिका-याविरुध्द कडक कार्यवाही करावी.

[३] आहरण व संवितरण अधिका-याच्या १९८६-८७ च्या <u>गोपनीय अहवालांत</u> नियंत्रक अधिका-यांनी व नियंत्रक अधिका-याच्या गोपनीय अहवालांत प्रशासकीय विभाग प्रमुखांनी संबंधितानी यासंबंधी केलेल्या प्रयत्नांबद्दल अभिप्राय लिहावेत.

[४] दिनांक ३१ मार्च १९८६ रोजी प्रलंबित असलेल्या एकंदर बाबी किती आहेत, त्यामध्ये अंतर्भूत एकूण रक्कम किती आहे याचा संपूर्ण तपशील संबंधित प्रशासकीय विभागाने प्राप्त करून घ्यावा व त्या सर्व बाबींचा निपटारा करण्याकरिता एक धडक कार्यक्रम हाती घ्यावा व त्याबाबतचा अनुपालन अहवाल एक महिन्याच्या आंत विधीमंडळ सचिवालय, महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता]-१, मुंबई, महालेखापाल [लेखा परीक्षा]-१, मुंबई, महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता]-२, नागपूर, महालेखापाल [लेखा परीक्षा]-२, नागपूर व सचिव [कोषागारे], वित्त विभाग, मुंबई यांचेकडे अविलंब सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व. अ. पंडित,
शासनाचे उप सचिव.

प्रत:-

सर्व मंत्रालयीन विभागांचे सचिव [नावाने],
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
उप सचिव, लोकलेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व प्रादेशिक प्रमुख,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकार/वरिष्ठ कोषागार अधिकारी,
महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता]-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता]-२, महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल, [लेखा परीक्षा]-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल, [लेखा परीक्षा]-२, महाराष्ट्र, नागपूर,
वित्त विभागांतील सर्व सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/सहाय्यक सचिव/ कक्ष अधिकारी/अधीक्षक,
वित्त विभागांतील सर्व कार्यासने.

----

एच-९२१[५,०००-३-८७]-२